नि.१२३ वरील आदेशानुसार सा.क्र.१ शिवाजी पाटील यांचा उलटतपास शपथेवर सुरु,

उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे वकिल एस.एस.शेठ वकिल

७. मी २००२ साली अंमलबजावणी अधिकारी म्हणुन भविष्य निर्वाह निधी कार्यालयात नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी २००० ते २०१० या कालावधीत अंमलबजावणी अधिकारी म्हणुन कार्यरत होतो असे दाखविणारा कागद प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी २००० ते २०१० या कालावधीत अंमलबजावणी अधिकारी म्हणुन कार्यरत होतो हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अंमलबजावणी अधिकारी म्हणुन कार्यरत असताना सांगली, सातारा व कोल्हापुर जिल्हयातील काहीच तालुके माझे अधिकार कक्षेत होते. हे म्हणणे खरे आहे की, मिरज तालुका माझे अधिकार कक्षेत होता हे दाखविणारा कोणताही कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे नेमणुक पत्रासोबत माझे कर्तव्यातील कोणती कामे आहेत हे नमुद केलेले असते. हे म्हणणे खरे नाही की, माझेकडे कोणती कर्तव्ये होती याचा कोणताही कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सहकारी संस्थांना भेटी देण्याचा आदेश होता असे दाखविणारा कोणताही कागद दाखल केलेला नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्या संस्थेला, किती तारखेला भेट दिली व तेथील काय परिस्थीती होती याची नोंद नोंदवहीत घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी कुपवाड या संस्थेला मी स्वतः भेट दिलेली नाही. हे मला सांगता येत नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी कुपवाड या संस्थेला कोणत्या अधिका-याने, कोणत्या तारखेला भेट दिली त्याचा अहवाल प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वर्दी जबाबात नमुद केलेला कालावधी स्वतः जावुन फॉर्म नं.१२अ तपासला असे घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः वसंतदादा शेतकरी सुतगिरणीत जावुन फॉर्म नं.१२अ ची प्रत घेतली असे घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या संस्थेत गेल्यानंतर तेथे काही त्रुटी आढळयास त्याची नोंद इन्स्पेक्शन बुक मध्ये करावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी या संस्थेत कोणत्या अधिका-याने इनस्पेक्शन नोट्स केल्या त्याचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, इनस्पेक्शनर नोट्स व इनस्पेक्शन रजिस्टर या प्रकरणात दाखल केलेले नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, दिगंबर जाधव हे कोणत्या तारखेला कोणत्या ठरावाने चेअरमन झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुर्यवंशी यांची लेखाधिकारी म्हणुन कोणत्या ठरावाने नेमणुक झाली ते मला सांगात येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सुर्यवंशी यांचे नेमणुक पत्र पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म नं.५अ हा मालाकाने त्याचे पद नमुद करुन शिक्का उमटवुन विभागीय आयुक्तांकडे सादर करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः संस्थेत न गेल्यामुळे फॉर्म क्र.५अ ची प्रत मला प्राप्त झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही सहकारी संस्थेचे मंजुर उपविधी असतात. हे मला माहित नाही की, एखादी जबाबदारी एक किंवा अनेक व्यक्तीवर द्यायची असेल तेव्हा तसा संचालक मंडळाचा ठराव लागतो. हे म्हणणे खरे आहे की, भविष्य निर्वाह निधीची रक्कम पगारातुन कपात करुन चलनाद्वारे स्टेट बँकेत भरायची असा ठराव संस्थेमध्ये किती तारखेला झाला होता ते मला सांगता येणार नाही.

प्रश्नः कोणत्याही सहकारी संसथेत ठराव झाल्याशिवाय संचालक मंडळाची जबाबदारी निश्चित होत नाही ?

उत्तर त्याचे माझा संबंध नाही.

१०. वर्दी दाखल करणेपुर्वी मी या ठरावाची प्रत प्राप्त करणेचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर्दीजबाब देणेपुर्वी मी मुळ फॉर्म क्र.५अ हा विभागीय आयुक्तांकडुन प्राप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फॉर्म क्र.५अ हा कोणत्या तारखेला कोणत्या अधिका-या मार्फत माझेकडे आला हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विभागीय आयुक्त यांचेकडे गेलेला फॉर्म क्र.५अ प्रकरणात दाखल केलेला नाही. मी फॉर्म क्र.५अ मधील परिच्छेद १० व ११ पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म क्र.५अ हा कारखान्याचे फॅक्टरी ॲक्ट नुसार नोंद असेलतर मॅनेजर व ऑक्युपायर यांनी तपशील भरावयाचा असतो. वसंतदादा शेतकरी सुतगिरणी ही फॅक्टरी ॲक्ट खाली नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म नं.५अ मधील परिच्छेद ११ नुसार ज्या व्यक्तीची नावे परिच्छेद १० मध्ये नमुद आहेत त्यांची संस्थेच्या व्यवसायास जबाबदार आहे अशी नोंद घेणेची आहे. हे मला सांगता येत नाही की, वसंदादा शेतकरी सुतगिरणी ही फॅक्टरी ॲक्टनुसार नोंद नसल्याने

त्यांना परिच्छेद १० मधील मजकुर लागु होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, परिच्छेद ११ मधील मजकुर हा परिच्छेद १० चे अनुशंगाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म नं.५अ च्या परिच्छेद ११ नुसार ज्या व्यक्तीचे नाव नमुद आहे तो व्यक्ती कोणत्या तारखेपासुन कार्यरत आहे ती तारीख नमुद करावी लागते. हे मला सांगता येत नाही की, फॉर्म नं.५अ मधील परिच्छेद ११ नुसार ज्या व्यक्तीचे नाव नमुद आहे त्याचे वय, त्याचे वडीलांचे नाव व त्याचा निवासी पत्ता नमुद करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, नि.१०६ वरील फॉर्म नं.५अ मध्ये परिच्छेद ११ मध्ये दिगंबर जाधव यांचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, फॉम नं.५अ वर मालकाची सही, हुद्दा व संस्थेची मोहोर असणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.१०६ व १०८ वर संस्थेची मोहोर उमटवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.१०६ व १०८ वरील फॉर्म हे भविष्य निर्वाह निधीच्या तरतुदीनुसार परिपुर्ती करणारे नाहीत. हे मला सांगता येत नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणीची शासनमान्य मोहोर होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांकडे दिलेल्या जबाबाप्रमाणे नमुद केलेली कागदपत्रे न्यायालयात सादर केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म क्र.१२अ वर दिगंबर जाधव यांची सही शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेब्रुवारी १९९९ ते जुन १९९९ व ऑगस्ट १९९९ ते फेब्रुवारी २००० या कालावधीसाठी दाखल केलेला फॉर्म नं.१२अ वर दिगंबर जाधव यांचे नाव व शिक्का नमुद नाही. हे मला माहित नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणीचे खाते सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेत होते. हे मला माहित नाही की, सहकारी संस्थेचे बॅकेचे खाते वापरण्यासाठी संचालक मंडळाचा ठराव करुन अधिकार द्यावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जावुन पगाराच्या रकमेतुन कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम वजा झाली आहे का याची पडताळणी केलेली नाही. मी वर्दी देणेपुर्वी वसंदादा शेतकरी सुतगिरणी संस्थेतील कामगाराला कोणत्या बँकेतुन पगार अदा केला जातो याची पहाणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.८९,९०,९१ मध्ये रकमा तारखामध्ये व्हाईटनर लावुन खोडुन लिहलेल्या मजकुरा शेजारी कोणाचीही स्वाक्षरी नाही.

प्रश्नः नि.८८ ते ९१ वरील चिफ अकौंटंटची स्वाक्षरी व नि.९२ ते ९७ वरील चिफ अकौंटंटची स्वाक्षरी उघडया डोळयांनी पाहिल्यास भिन्न असल्याचे दिसते ?

(सदर प्रश्नास सहा.सरकारी अधियोक्ता यांनी साक्षीदार हा एक्सपर्ट नसल्याने त्याला

स्वाक्षरीमधील फरक विचारता येणार नाही अशी हरकत घेतली.

त्याला आरोपीच्या विधिज्ञांनी कथन केले की साक्षीदाराच्या जबाबातुन प्रश्नातील नमुद कागदपत्रे शाबीत केलेली असल्यामुळे साक्षीदारास भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदीनुसार स्वाक्षरीतील डोळयांनी दिसणारा फरक सांगाता येवु शकत असल्यास प्रश्नाला घेतलेली हरकत नामंजुर करणे आवश्यक आहे. साक्षीदारास विचारलेला प्रश्न हा त्याला कागदपत्रे दाखवुन विचारेला प्रश्न असल्याने व भारतीय पुराव कायद्याच्या तरतुदीनुसार एखादे तथ्य म्हणजे जे की, एखाद्या व्यक्ती त्यांच्या संवेदनानुसार जाणु शकतो असे असल्याने व कलम १४५ नुसार उलटतपासासामध्ये कोणत्याही तथ्याबाबत प्रश्न विचारले जावु शकताटत त्यामुळे प्रश्नास घेतलेली हरकत नामंजुर करण्यात येते. )

उत्तरः नि.८८ ते ९१ आणि नि.९२ ते ९७ वर असलेल्या चिफ अकौंटंटच्या सही मध्ये फरक आहे.

११. मी कामगारांचे मुळ पगारपत्रक रजिस्टर ताब्यात घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुळ पगारपत्रक रजिस्टर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेब्रुवारी १९९९ ते जुन १९९९, ऑगस्ट १९९९ ते फेब्रुवारी २००० या कालावधीतील मुळ पगारपत्रके दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे कार्यालयाने जप्त केलेले मुळ पगारपत्रक प्रकरणात दाखल केलेले नाही. साक्षीदार पुढे सांगतो की ते मुद्देमालात दाखल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी पगारपत्रक घेतले व ते मुद्देमालात हजर केले ते खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमा पगारातुन कपात करण्यात आल्या हे मी खोटे सांगतो.

१२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दिल्यानंतर भविष्य निर्वाह निधीच्या कलम ७अ नुसार जी चौकशी झाली त्या चौकशीत माझा सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कलम ७अ नुसार झालेल्या चौकशीचा अहवाल प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी संस्थेवर अवसायक कोणत्या तारखेला नेमला गेला हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणीचे मार्च २००१ ते ऑगस्ट २००१ चे रेकॉर्ड मागणेची नोटीस कोणत्या तारखेला दिली ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ३०-१०-२००१ रोजी सहा.आयुक्त यांना वसंतदादा

सुतगिरणीतर्फे पाठविलेल्या पत्राची प्रत प्रकरणात दाखल केलेली नाही. साक्षीदारास नि.१०९ दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, ती नोटीस प्रभारी कार्यकारी संचालक वसंदादा शेतकरी सुतगिरणी यांचे स्वाक्षरीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, भविष्य निर्वाह निधी कार्यालयात पत्र व्यवहाराचे आवक जावक रजिस्टर असते. हे म्हणणे खरे नाही की, नि.१०९ च्या पत्राची नोंद माझे कार्यालयाच्या आवक नोंदवहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.१०९ चे पत्रावर आवक नोंदीचा शेरा नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आवक रजिस्टर पोलिसांना दिले नाही किंवा प्रकरणात हजर केलेले नाही. सहा.आयुक्त थोरवे यांनी मार्च २००० ते ऑगस्ट २००० या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरली नाही म्हणुन पाठवलेले पत्र कोणत्या तारखेला पाठविले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते पत्र पोलिसांसमोर सादर करा, असा लेखी आदेश दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,  दि.१४-८-२०१४ रोजी अवसायक यांनी विवादीत भविष्य निर्वाह निधीची रक्कम दंडासह माझे कार्यालयात भरलेली आहे.

१३.  हे म्हणणे खरे आहे की, ७-२-२००२ चे पत्रात प्रस्तुत आरोपींची नावे व पदे नमुद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, ७-२-२००२ चे पत्रात वसंतदादा सुतगिरणीच्या जबाबदार व्यक्तींविरुध्द फिर्याद दाखल करा असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः जबाबदार व्यक्ती कोण ते ठरवले. हे म्हणणे खरे आहे की, ७-२-२००२ चे पत्रा व्यतीरिक्त प्रस्तुत आरोपींविरुध्द फिर्याद दाखल करा असे लेखी आदेश नाहीत. मी पोलिसांपुढे २ ते ४ वेळेला जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, २१-२-२००२ च्या मुळ वर्दीजबाबामध्ये मी २८,२०,३३६/- इतकरी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करुन भरलेली नाही असे कथन केले होते. हे मला आठवत नाही की, दि.२-३-२००२ चे जबाबामध्ये त्याच कालावधीसाठी ३५,०१,९८३/- इतकी भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरलेली नाही असे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, दि.६-३-२००२ रोजीच्या जबाबामध्ये मी त्याच कालावधीतीसाठी ३४,३७,२५८/- इतकी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करुन भरलेली नाही असे सांगीतले. हे मला आठवत नाही की, १६-११-२००२ चे जबाबात ६१,३६,०१५/- ही रक्कम अपहाराची रक्कम असल्याचे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, विवादीत कालावधीमध्ये वसंतदादा शेतकरी सुतगिरणीच्या कोणत्याही कामगाराच्या पगारातुन

भविष्य निर्वाह निधीची कोणतीही रक्कम कपात करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, १४-८-२०१४ रोजी अवसायकाने भरलेली रक्कम १,५७,३४,१४१/- इतकी होती. हे म्हणणे खरे आहे की, अवसायकाने भरलेल्या रकमेमध्ये वादातील कालावधीतील भविष्य निर्वाह निधीच्या कपात केलेल्या रकमेचा समावेश आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने भविष्य निर्वाह निधीच्या कोणत्याही रकमेचा अपहार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ६४,५७,४४५/- इतक्या रकमेचा अपहार झाला हे खोटे सांगतो. हे मला माहित नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणी या संस्थेने आरोपी क्र.२ विरुध्द भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा अपहार झाला म्हणुन काणेतीही कारवाई केली नाही. हे मला माहित नाही की, वसंतदादा शेतकरी सुतगिरणीच्या लेखापरिक्षकाने भविष्य निर्वाह निधीचा अपहार झाला असे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर्दी देताना माझे ताब्यात १२अ व ५अ चे फॉर्म नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ते फॉर्म वर्दी दिल्यानंतर पोलिसांनी माझे कार्यालयातुन पंचनामेद्वारे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, मी जिल्हा मध्यवर्ती बँकेतील पगारा सबंधीचे अभिलेख न पाहता खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपातासील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ हे राजकीय व्यक्ती असल्याने त्यांना राजकिय द्वेषापोटी प्रकरणात गोवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ कडे कामगारांच्या पगारातुन रक्कम कपात करुन भविष्य निर्वाह निधीत भरण्याची जबाबदारी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेचे संचालक मंडळ अस्तित्वात होते.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/-

सांगली. ( पी.पी.केस्तीकर )

दिनांक २८/०७/२०२३ मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली.